# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 11/12/2021 (शनिवार)

## नागपूर ग्रामिण जिल्हा पोलीसांचे जनजागृती अभियान...

आताच्या युगामध्ये इंटरनेट, मोबाईलचा वाढता वापर त्याबरोबरच सोशल मिडीया, ऑनलाईन पेमेंट या सर्व बाबी दैनंदीन गरजा झालेल्या आहेत. त्यामुळेच गुन्ह्याचे स्वरुप सुध्दा बदलले असुन सायबर क्राईम हा एक आव्हानात्मक गुन्ह्याचा प्रकार पोलीसांसमोर आहे. कॉलेजमधील मुलेमुली यांचेमध्ये सोशल मिडीयाचा वापर मोठ्या प्रमाणात होताना दिसुन येतो. सायबर क्राईमला प्रतिबंध करण्यासाठी प्रत्येक नागरीकाने खबरदारी घेणे आवश्यक आहे. नागरीकांमध्ये व तरुण/तरुणी यांची जनजागृती करण्यासाठी नागपूर ग्रामिण जिल्हा पोलीस अधिक्षक श्री. विजयकुमार मगर यांचे मार्गदर्शन व संकल्पनेतुन महाविद्यालयीन तरुण/तरुणीकरीता सायबर क्राईम व अंमली पदार्थ विरोधी कायदा याबाबत जनजागृती अभियानास (Awareness Program) सुरवात करण्यात आलेली आहे.

आज दिनांक-11/12/2021 रोजी सकाळी 11 ते दुपारी 1.00 वाजता दरम्यान नागपूर ग्रामिण जिल्हा पोलीस यांचे वतीने **महात्मा गांधी कला व वाणिज्य महाविद्यालय, पारशिवणि** येथे कोविड-19 नियमांचे पालन करुन सायबर क्राईम व अंमली पदार्थ विरोधी कायदा याबाबत जनजागृती अभियान हा कार्यक्रम घेण्यात आला. या जनजागृतीपर कार्यक्रमामध्ये पोलीस निरीक्षक राजेंद्र निकम, आर्थिक गुन्हे शाखा प्रभारी नागपूर ग्रामिण यांनी अंमली पदार्थ विरोधी कायद्याबाबत माहीती देवुन समाजामध्ये व तरुण मुलांमध्ये अंमली पदार्थाचे काय दुष्परीणाम होतात याबाबत माहीती देवुन मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे पोउपनि विकास मुंढे, महिला पोलीस स्नेहलता ढवळे, सायबर सेल, नागपूर ग्रामिण यांनी सायबर गुन्ह्याबाबत माहीती देवुन गुन्हे कसे घडतात व काय खबरदारी घ्यावी याबाबत माहीती दिली.

या क्रार्यक्रमामध्ये **महात्मा गांधी कला व वाणिज्य महाविद्यालय, पारशिवणि येथील 200 विद्यार्थी/विद्यार्थीनी व कॉलेजचे प्राचार्य व सर्व प्राध्यापक हे उपस्थित होते. तरी नागपूर ग्रामिण पोलीसांतर्फे असे आवाहन करण्यात येते की, कोणतेही अनोळखी फोनकॉल, सोशल मिडीयावरील फ्रेंड रिक्वेस्ट यांना प्रतिसाद देवू नये. सायबर क्राईम बाबत तात्काळ तक्रार नोंदविण्याकरीता जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये किंवा** www.cybercrime.gov.in**यावर जावुन तक्रार नोंदवावी.**











## <u>ड्राइव्ह अँड डाइन रेस्टॉरंट मधील हुक्का पार्लर वर धाड</u>
## <u>स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणची कारवाई</u>

दिनांक 11.12.2021 रोजी ऑल आऊट ऑपरेशन दरम्यान आपले मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पथक सावनेर उपविभागात पेट्रोलींग करीत असतांना खात्रीशिर गोपनिय माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत मौजा कवडस शिवारातील सावनेर—नागपूर महामार्गावरील ड्राईव्ह अँड डाईन रेस्टॉरंट येथे अवैधरित्या विदेशी दारूची विक्री व हुक्का पार्लर सुरू आहे अशी माहिती मिळाल्याने पोलीस स्टाफसह नमुद ठिकाण कार्यवाही केली असता. तिथे विदेशी दारू व हुक्क्याचे साहित्य, हुक्का पॉट, चिलम, पाईप मिळुण आल्याने आरोपी 1) सिध्दार्थ सुनिल अग्रवाल वय 36 वर्षे, रा. सदर नागपू व 2) अजय मंगलसिंग राठोड वय 29 वर्षे रा. आर्णी जिल्हा यवतमाळ यांचे ताब्यातुन विदेशी दारू व हुक्क्याचे साहित्य ज्यामध्ये हुक्का पॉट, हुक्का चिलम, पाइप इत्यादी व |पमिमद कंपनीचे प्रतिबंधीत सुगंधित तंबाखु असा एकुण 9,119/— रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. व आरोपीविरूध्द पोलीस स्टेशन सावनेर येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक राहुल माकणिकर यांचे मार्गदर्शनात पोनि अनिल जिट्टावार, सहा.पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, पोलीस नाईक आशिष मुंगळे, किशोर वानखेडे, उमेश फुलबेल, पोलीस शिपाई रोहन डाखोरे, अशुतोष लांजेवार यांनी पार पाडली.



## घरफोडी

पो.स्टे. बुटीबोरी :– अंतर्गत 03 कि.मी. अंतरावरील मौजा सेक्टर ई: 2 प्लॉट नं 19 सिडको कॉलनी भाउसाहेब मुळक कॉलेज सातगाव येथे दिनांक 07/12/2021 चे 14.00 वा. ते दिनांक 10/12/2021 चे 10.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– ज्वाला शिवपुजन चौधरी वय 24 वर्ष, रा. मौजा सेक्टर ई: 2 प्लॉट नं 19 भाउसाहेब मुळक कॉलेज जवळ सिडको कॉलनी बोरी हे दि 07/12/2021 रोजी मोठया बहीनीकडे पालघर जि. ठाणे येथे लग्न कार्याकरीता गेले असता दि 10.12.21 रोजी 10.30 वा. घरी परत आले असता फिर्यादी यांनी मेन गेट खोलुन घरात प्रवेश केला. त्यांचे किचन दरवाजाचे लोखंडी रॉड हे तुटलेले दिसले त्यानंतर बेडरूम मध्ये प्रवेश केला असता लोखंडी आलमारी तोडुन त्यातील सामान फेकलेले दिसले. फिर्यादी घरी नसतांना अज्ञात आरोपीने त्यांचे घरातील बेडरूम मधील आलमारी मध्ये ठेवलेले सोन्या–चांदीचे दागिने कि. 71,000/–रू. व नगदी 60,000/– रू. असा एकुण कि. 1,31,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बुटीबोरी येथे आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी श्री आशिष मोरखेडे मो. क्र. 8208751249 हे करीत आहे.

## जबरी संभोग

पो.स्टे. भिवापुर :– दिनांक 03/12/2021 ते दिनांक 09/12/2021 चे 11:30 वा. चे सुमारास वय 14 वर्ष फिर्यादी/पीडित हिचेवर आरोपी नामे– किष्णा हरीचंद्र काबंडी, वय 22 वर्ष, रा. सेलोटी ता. भिवापूर जि. नागपूर याने फिर्यादी त्याचे घरी व पीडितेचे जुणे घरी दोन वेळा बळजबरीने शारीरिक संबध केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम 376, 376 (2)(आय)(जे) भादंवि. सहकलम 4, 6, 8, 12 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायदा सहकलम 3(2)(व्हिअे)3(1)(डब्लु)(i),(ii) अनुसुचित जाती/अनुसुचीत जमाती अत्याचार प्रतिबंधक अधि. 1989. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री. महेश भोरटेकर हे करीत आहे.

## निष्काळजीपणामुळे मृत्यु

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 06 कि.मी. अंतरावरील मौजा चारगांव गोठाळी शिवार येथे दिनांक 14/11/2021 चे 16.00 वा. दरम्यान आरोपी राजेश दादाजी सावसाखडे वय 59 वर्ष रा. चारगांव गोठाळी याने आपले शेतातील असलेल्या बोडीतील पाणी काढण्यासाठी विनापरवाणा ईलेक्ट्रीक घेवुन जमीनीवरून विद्युत वायर टाकुन विद्युत वायर कट असल्यामुळे किंवा विद्युत मोटारला करंट आल्यामुळे बोडीतील पाण्याला करंट येवुन सदर बोडीचे पाण्यात मानुस गेल्यास त्याचा जिव जावु शकतो हे माहित असुन सुध्दा वरील नमुद घटना तारीख वेळी व ठिकानी विना परवाणा जे.के. स्टोन क्रशर कंपणी मधुन विद्युत घेवुन आपले स्वताचे शेतातील बोडीत विद्युत करंट लावुन बोडीतील पाणी ओडत असता शेतातील बोडीचे पाण्यात विनोद दादाजी डडमल वय 35 वर्ष हा मासे पकडण्यास गेला असता त्यास विद्युत करंट लागुन तो बोडीचे पाण्यात पडुन पाण्यात बुडुन मरण पावल्यास कारनीभुत झाल्याचे मर्ग क्रमांक 65/2021 चे चौकशी वरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार गणेश गिरडकर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 304 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील सपोनि श्री राजेश पाटील मो नं 9049989341 हे करीत आहे.

## फसवणुक

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 1 कि मी अंतरावर मिलन चोक मंगळवारी पेठ येथे दिनांक 28/10/2021 चे 13.19 वा. ते दिनांक 07/12/2021 चे 09.01 वा. दरम्यान फिर्यादी प्रविण केशव लाडेकर वय 40 वर्ष रा मिलन चौक मंगळवारी पेठ उमरेड ला 9405330706 वर मोबाईल क्र, 9905913541 वरून कॉल आला व फोनवर व्यक्तीने सांगीतले एस,बी,आय, क्रेडीट कार्ड कडून बोलत आहे तुमचा कार्ड्र बंद करायचा आहे तुमच्या क्रेडीत कार्डवर 27000 रू, बाकी आहे ,तुमचे क्रेडीट कार्ड बंद करायचे असेल तर आताच बंद करून देतो , तुमच्या मोबाईलवर एक ओटीपी येईल तो,ओटीपी त्याला सांगा असे म्हटले त्याचे बोलणे वर विश्वास ठेवून फिर्यादीनी मोबाईलवर आलेला ओटीपी फोनवर सांगितला त्यानंतर त्यांनी तुमचे काड्र बंद करण्याबाबत ची प्रक्रीया केली आहे तुमचे पत्तयावर एनओ, सी पत्र येईल असे सांगून फोन बंद केला दि, 07.12.21 रोजी 9.01 वा, फिर्यादी हा त्याचे मोबाइल वरील मॅसेज पाहत असता क्रेडीट कार्ड वरून 4,72,489 रू, ची खरेदी करण्यात आली आहे व 39000 रू, मासिक किस्त दि, 8.12.21 रोजी भरणे आहे, असा मैसेज दिसून आलयाने फिर्यादीने एस,बी,आय, शाखा उमरेड येथे विचारणा केली असता कोणताही मॅसेज पाठविला नाही तुमचे सोबत गैरप्रकार घडला आहे असे सांगितले वरून फिर्यादीने मोबाईल क्र, 9905913541 वरील अज्ञात ईसमाने क्रडीत कार्ड बंद करतो, असे म्हणून 4,72,489 रूपयेची फसवणूक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 420 भादंवि. सहकलम 66 माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोनि सोळसे मो,न 7038046399 हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. खापरखेडा :– दिनांक 10/12/2021 चे 13.00 वा. दरम्यान फिर्यादी/पीडित वय 17 वर्ष आरोपी नामे– महेंद्र रमेश मेश्राम, वय वर्ष, रा. सिंधी झुनकी ता. कळमेश्वर याने फिर्यादीचा पाठलाग करून 'मी तुझ्यावर प्रेम करतो, तु मला शेतात एकटी भेटण्याकरीता ये' त्यामुळे फिर्यादीचा मनाला लज्जा वाटली 'तु जर मला भेटायला आली नाही तर तुझ्या पतीला व मुलाला मारून टाकील' अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 354,354 ए(2), 452 भादंवी. सहकलम 8 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार मो. क्र. 9923168573 हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यु

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 09 कि.मी. अंतरावरील चिकना शिवार येथे दिनांक 30/11/2021 सुमारास कैलास बळीराम गावंडे (मृतक), वय 38 वर्ष रा. चिकना ता. कामठी जि. नागपुर यांनी मौजा चिकना शिवारातील शेतात कोणतेतरी विषारी औषध प्राशन केल्याने त्यास मेडीकल कॉलेज नागपुर येथे उपचारकामी दाखल केले असता उपचारा दरम्याण मृत्यु झाला. सदर मर्ग संबधाने आज दि. 10.12.2021 रोजी कागदपत्र प्राप्त झाल्याने मा. पो.नि. सा. यांचे आदेशाने पोस्टे मौदा येथे मर्ग दाखल करून तपासात आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा कुथे मो.नं. 9764007720 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर